**<u>निशाणी ६४ खालील आदेश</u>**
**( दिनांक ०८ जून २०२० रोजी घोषित )**

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश—६ नियम—१७ अन्वये दाव्यात दुरूस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथन की, मयत उध्दव माळी व त्यांच्या भावाची पत्नी उमाबाई यांच्यातील रे.मु.नं.१९८/१९७९ या दाव्यातील निकाल पत्रानुसारच्या दरखास्तीअन्वये वाद मिळकती त्यांना वाटून आल्या व उमाबाई हिने तिच्या हिश्याची जमीन प्रतिवादी क्र.५ यांच्या नावे वादी व इतर प्रतिवादींच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकतीतून खरेदी केली. त्यामुळे ती एकत्र कुटुंबाची मिळकत आहे. तसेच मयत उध्दव यांच्या हक्कात वाटणीने मिळालेल्या जमीनीचे मृत्युपत्र प्रतिवादी क्र.१च्या नावे करून त्याबाबत प्रोबेट मिळवून त्याची नोंद करून घेतली व त्याविरूध्द न्यायालयात मागितलेली दाद प्रलंबित आहेत अशा आशयाचा मजकुर सदर दुरूस्ती अन्वये दाव्यात नमुद करण्यासाठीची मागणी वादीने केली आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. म्हणून अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी सदरील अर्जास आपले म्हणणे सादर करून आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे अशा प्रकारची दुरूस्ती दाव्यात करता येणार नाही. सदरची मालमत्ता ही प्रतिवादींची स्वकष्टार्जित मिळकत असून जमीनीच्या या पुर्वीच वाटण्या झाल्या आहेत. प्रोबेट बाबतची माहिती वादीस या पुर्वीच होती. त्यामुळे सदरची दाद आता वादीस मागता येणार नाही. प्रकरणात साक्षीपुरावा सुरू असुन प्रकरण उलटतपासासाठी आहे. सदरची दुरूस्ती वाटपाच्या मुळ दाव्याच्या स्वरूपास बाधा आणणारी आहे. त्यामुळे अशी दुरूस्ती मागता येणार नाही. म्हणून अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजुचे कथन व विवेचन ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने दावा मिळकत १अ व १ब मधील हिस्सा आणि ताबा मिळणेसाठी केला आहे. सदरचा अर्ज दावा दुरूस्तीचा असल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश—६ नियम—१७ अन्वये पात्र आहे किंवा कसे यासाठी प्रथमत सदरची दुरूस्ती न्यायासाठी आवश्यक आहे किंवा कसे हे पाहणे आवश्यक आहे. प्रस्तुतच्या दाव्यात या पुर्वीच वादीने मयत उध्दव माळी व उमाबाई माळी यांच्यातील वाटपाच्या दाव्याबाबतचा उल्लेख व त्या आधारे त्यांना प्रत्येकी येणारा हिस्सा याबाबतचे वर्णन केलेले आहे. तसेच मयत उध्दव माळी यांनी प्रतिवादी क्र.१ याच्या हक्कात मृत्युपत्र केल्याची बाब, तसेच प्रोबेट मिळण्यासाठीचा अर्ज दाखल केल्याची बाब दाव्यात यापुर्वीच नमुद केली आहे. प्रतिवादींनी निशाणी ३० वर जबाब दावा दाखल करत असताना याबाबत सविस्तर म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे वाद मालमत्तांची यापुर्वीच वाटणी झाली असून वादींनी आपला हक्क सोडून दिला आहे व त्यांना आता हक्क मागता येणार नाही असे विवेचन यापुर्वीच दाखल केले आहे. तसेच प्रतिवादी क्र.५ यांच्या हक्कात उमाबाई यांनी खरेदीखत करून दिल्याची बाब, ती स्वकष्टार्जित मिळकत असल्याची बाब तसेच प्रतिवादी क्र.१ याच्या हक्कातील उध्दव माळी यांनी करून दिलेल्या मृत्युपत्राची बाब जबाब दाव्यात यापुर्वीच नमुद आहे. यावरून असे स्पष्ट होते की, प्रस्तुत दावा दुरूस्तीच्या अर्जातील कथन व त्यावर सादर केलेले आक्षेपाचे कथन दाव्यात व जबाब दाव्यात यापुर्वीच स्थानांकित झाले आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या दुरूस्तीमुळे वाद कथनात अथवा जबाब दाव्यातील आक्षेपात काही मुलभुत बदल होतील असे वाटत नाही.

५. सदरची दुरूस्ती न्यायनिर्णयासाठी आवश्यक आहे किंवा कसे हे पाहणे आवश्यक ठरते. अर्जातील कथनाप्रमाणे वाद मिळकतीतील मयत उध्दव यांचा हिस्सा व त्या हिश्यातुन निर्माण होणारा पुढील अधिकार यावर दाव्याचा

निर्णय अवलंबुन आहे. रे.मु.नं.१९८/१९७९ या निर्णयाविरूध्द दिवाणी अपील क्र.३०/१९८९ मधील निर्णयाप्रमाणे जमीनीची वाटणी मिळाल्याचे कथन वादी आपल्या अर्जात करत आहे. सदर अपीलाच्या निर्णयाची व त्याप्रमाणे मिळालेल्या जमीनीचा उल्लेख विस्तृतपणे या दाव्यात दिला नाही. त्यामुळे पुर्वी निर्णित झालेल्या दाव्या बाबतचे सविस्तर वर्णन व त्यातुन निर्माण झालेले अधिकार व त्यांचे हस्तांतरण याबाबत स्पष्टीकरणासह अर्जात केलेले स्पष्टीकरण हे न्यायदानासाठी सोयीस्कर ठरणार आहे. या कथनांचा गाभा पुर्वीच दावा व जबाब दावा यात नमुद असल्याने अर्जातील प्रस्तावित दुरूस्तीमुळे नविन कथन अभिलेखावर येण्याची शक्यता दिसुन येत नाही. उलट या प्रस्तावित दुरूस्तीमुळे वाद कथनाला सुस्पष्टता प्राप्त होते. त्यामुळे योग्य त्या न्यायनिर्णयासाठी सदर दुरूस्तीची आवश्यकता भासते.

६. प्रतिवादीच्या आक्षेपानुसार साक्षीपुरावा सुरू झाल्यानंतर सदरचा अर्ज मंजुर करता येणार नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश—६ नियम—१७ अन्वये पुरावा सुरू झाल्यानंतर जर अर्जदार ती दुरूस्ती पुर्वी का केली नाही याचे सुयोग्य स्पष्टीकरण देत असेल तर पुराव्यानंतरही अपवादात्मक स्थितीत दाव्यात दुरूस्ती करता येते. अर्जातील कथनाप्रमाणे उलटतपास देण्याची तयारी करत असताना कथित बाबी समोर आल्यामुळे पुरावा सुरू होण्यापुर्वी त्याचे स्पष्टीकरण देता आले नाही. सदर कथन हे ग्राहय धरता न येण्यासाठी सबळ असे कोणतेही कारण समोर येत नाही. उलट सदर मागणी केलेले स्पष्टीकरण हे दावा योग्य प्रकारे निर्णित करण्यासाठी आवश्यक असल्याचे स्पष्ट होते. सदर दुरूस्तीनंतर प्रतिवादीस दुरूस्ती कथनावर जबाब दावा देण्याचा अधिकार अबाधीत राहाणार आहे. तसेच वादीला त्याबाबत उलटतपासात प्रश्न विचारण्याची संधी प्रतिवादींना उपलब्ध आहे. त्यामुळे प्रतिवादीच्या हक्कावर कोणतीही बाधा येणार नाही. वर केलेल्या स्पष्टीकरणावर वादी हा पुरावा देण्यापुर्वी जागृक नव्हता असे म्हणता येणार नाही. या सर्व कारणावरून सुयोग्य अशा न्यायनिर्णयासाठी प्रस्तावित

दाव्यातील दुरूस्तीची परवानगी वादीस देणे हे न्यायोचित ठरते. सदरची दुरूस्ती प्रस्तुत दाव्यास पुन्हा प्रतिवादीचा सुधारीत जबाब दावा या मुळ पायरीवर नेवुन ठेवेल. त्यामुळे प्रकरणास आणखी विलंब होईल. यासाठी सदरचा दुरूस्ती अर्ज मंजुर करतेवेळी वादीस विलंब केल्यामुळे दंड आकारणे आवश्यक आहे. म्हणुन हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीस अर्जातील प्रस्तावित दुरूस्ती दाव्यात करण्याबाबतची परवानगी दंडाची रक्कम रू.५००/— यास अधीन राहुन देण्यात येते.

३. संबंधीत पक्षकारांनी याची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Prasanna Ramrao Kulkarni
Date: 2020.06.09 14:18:43 +0530

दिनांक : ०८/०६/२०२०
मोहोळ.

( प्रसन्ना रा. कुलकर्णी )
सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मोहोळ.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shaikh N. M. |
| Court | : | Jt. C.J.J.D.&JMFC.,Mohol. |
| Date | : | 08-06-2020 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 09-06-2020 |
| Judgment/Order uploaded on | : | 09-06-2020 |